# दक्षिण : देखणी यक्षिण

## दक्षिण भारताचे अत्यंत वेधक व नावीन्यपूर्ण प्रवासवर्णन

प्रा. चंद्रकुमार नलगे

**अजब पब्लिकेशन्स्**
*भाऊसिंगजी रोड,*
*कोल्हापूर- ४१६ ०१२*

▶ **दक्षिण देखणी यक्षिण : प्रा. चंद्रकुमार नलगे**

▶ ©
**प्रा. चंद्रकुमार नलगे**

▶ **प्रकाशक**
अजब पब्लिकेशन्स्
भाऊसिंगजी रोड, कोल्हापूर.
फोन : (०२३१) २५४६७१०

▶ **अक्षरजुळणी**
रावजी देसाई

▶ **मुखपृष्ठ**
चित्रमित्र पब्लिसिटी, कोल्हापूर.

▶ **मुद्रक**

▶ **आवृत्ती**
जानेवारी २००९

▶ **किंमत**
रुपये २३०/-

मा. वसंतराव दत्तवाडे, संपादक दैनिक महासत्ता
मा. वासुदेव कुलकर्णी, कार्यकारी संपादक दैनिक ऐक्य
मित्रवर्य प्रा. दैवदत्त पाटील
प्रा. वि. द. कदम
प्रा. एन. एस. क्षीरसागर
प्रा. बी. जी. पाटील
श्री. पंढरीनाथ शेवाळे
प्रा. सर्जेराव पाटील
श्री. आनंद हांडे
आपणा सर्वामुळेच ही दक्षिण यात्रा मला घडली.

# दक्षिण : देखणी यक्षिण

## १

अधिक आषाढ संपला होता. नेहमीच्या आषाढी पावसानंही दडी मारली होती. खरा नित्याचा आषाढ सुरू झाला नि आभाळ ढगांनी मोहरून आलं. आतापर्यंतचं निळं आभाळ काळ्या सावळ्या ढगांनी व्यापून गेलं. कधी झरझर पाऊस. कुठं नुसतीच रिमझिम. केव्हाशी झुंझरूक, नुसताच तुषारांचा शिडकावा. सावळा दिवस काळ्या अंधाराच्या पडद्याआड झाला. आमची गाडीही काळा अंधार चिरीत धावू लागली. रस्त्यावरून धावणाऱ्या दिव्याशिवाय काहीच दिसत नव्हतं. दिव्यांचा प्रकाश फाकत होता. मावळत जात होता. पुढच्या झाडाझुडातून नवा प्रकाश उजळत येताना दिसत होता. फक्त चकचकीत रस्त्याचं अस्तित्व तेवढं जाणवत होतं.

सारं जगच आमच्या नजरेतून पुसलं होतं. मनातून अंतरलं होतं. गाडीच्या अखंड वेगानं नजरही मंदावत चालली होती. देह आणि मन पेंगुळत चाललं होतं. झोपेच्या खोल गुहेत हळूहळू विरत चाललं होतं. सभोवार सारं निस्तब्ध होतं. गाडीत मी आणि महासत्ताचे संपादक वसंतराव दत्तवाडे होते. ओलसर वाऱ्याशी गारशी शिरशिर जाणवत होती. तीही स्पर्शापलीकडं होत गेली. संवेदनेत आम्ही राहिलो

नाही. केव्हा तरी अंतर्मनाला जाग चाळवली की एवढंच कळे की, गाडी चालली आहे... धावते आहे.

मध्यान्ह रात्र झाली असावी. अचानक गाडी एकदम उडून आदळली. आम्हाला धक्के बसले. त्याचवेळी जाग आली. अगदी तारवटलेल्या डोळ्यांची ती कडकडून आलेली जाग मनात भीती उभी करून गेली.

मोठा स्पीड ब्रेकर लागला होता. आम्ही डोळे उघडले तेव्हा बाहेर प्रचंड पाऊस कोसळत असलेला रस्त्यावरच्या अंधुक प्रकाशात जाणवला. आजूबाजूला काहीच दिसत नव्हतं. फक्त कोसळणारा पाऊस, भयाण एकांत. जंगलात अडकलेला तडतडा पावसाचा रस्ता. बाजूच्या कपारीवरून लाल पाणी रस्त्यावर कोसळत होतं. पावसाच्या काचेवर फुटलेल्या धारांनी समोरचं दिसतही नव्हतं.

ड्रायव्हरनं रस्ताही दिसेना म्हणून गाडी उभी केली.

गाडीचा वायपर काचेवरचं पाणी निथळून टाकण्याचा वेडा प्रयत्न करत होता.

मघा संपादक साहेबांना जाग आली होती. पण सारा भरवसा ड्रायव्हरवर टाकून ते झोपेच्या गुहेत शिरले. दुसऱ्यावर त्यांचा दांडगा विश्वास. पावसाचा मारा सहन करीत असलेली गाडी. ते कचक लपक करणारा वायपर. पाऊस झोडपीत असल्याने बधिर होऊन पडलेला रस्ता.

पावसानं गारठलेली एकांत माध्यान्ह.

आणि डोळे टक्क उघडे करून ते भयाण रूप पाहात असलेले आम्ही दोघे. मी आणि ड्रायव्हर.

ड्रायव्हरनं बिडी पेटवली. शिणलेल्या डोळ्यांनी ऊब घेतली.

बाहेरची काचच तेवढी दिसत होती आणि आत बिडीच्या बारीक मंद झुरक्यानिशी पेटलली बिडीची लाल धग. एक विलक्षण वातावरणाचा विळखा. मी मंदावलेल्या नजरेनं आकसत गेलो.

आणि माझं मान नसलेलं कासव बनलं.

ड्रायव्हरनं गाडी चालू केली. डोळ्यात जाग आली. पाहातो तर पाऊस थांबत आला होता. त्याचा भर ओसरला होता. समोरचा काळा रस्ता चकचकीत दिसत होता. रस्त्याच्या दोन्ही बाजूची प्रचंड उंचीची झाडं फक्त आकारानं जाणवत होती. रस्त्यावर एकही वाहन लागत नव्हतं. गाडी वळणं घेत, तोल आवरीत चालली होती. मी ड्रायव्हरला म्हटलं,



'हे मोठं जंगल दिसतंय.'

'जंगल कसलं हा प्रचंड घाट आहे. बेल्लारीचा. मोठा अवघड.' ते प्रचंड कडे, प्रचंड उंची झाडी पाहून माझं काळीज दबून गेलं.

'रात्री एकट्यानं गाडी न्यायची म्हणजे कठीणच.'

'बघा ना. एवढा रस्ता तोडला, कुठं वाहन लागलं नाही. फार कठीण प्रवास. आता डांबरी रस्ता झालाय. पूर्वी पायऱ्या पायऱ्यासारखा रस्ता होता. इथं जंगलात कुणी तरी स्वामीनं मठ स्थापन केला नि रस्त्याची कायाच पालटली. नाही तरी एखादी तरी गाडी मोडून पडलेली दिसायची. रात्रीचा तर घाट बंद. गाडीचं काही झालं की मागं पुढं कुठं पळायचं. शंभर मैल इकडं नि शंभर मैल तिकडं. गाव कुठं शोधायचं, जल्माची ठेपच.'

घाटाची भीतीदायक वळणं घेत गाडी चालली होती. उघडलेल्या पावसानं परत रिपरिप धरली. सारा अवघड मारा सहन करणारा ड्रायव्हर पेंगुळला. 'पाऊस काही थांबत नाही. आता गोकर्ण जवळ आलंय. घाटाच्या पायथ्याशी एक हॉटेल आहे तिथं थोडं थांबू. झोपेच्या एक डुलका घेऊ नि पहाट व्हायच्या आधी निघू.' शिणलेल्या ड्रायव्हरचा घोगरा आवाज कानावर आला.

घाट संपला. हॉटेल आलं. अनेक थांबलेल्या ट्रक गाड्या अंगावर पाऊस झेलीत डोळं विझवून उभ्या होत्या. हॉटेलमध्ये एक तांबूस दिवा या सगळ्या अस्तित्वाची खूण म्हणून कसाबसा जळत होता.

आम्ही गाडीतच बसल्या बैठकीत झोपेसाठी अंगं सैल केली.

थोडंसं उजळ झालं होतं. पहाट झाली असावी. पावसाची बारीक चिकचिक चालू होती. गाडी झाडीतून सरसरत पुढं आली. नि दोन्ही बाजूला लांबवर पसरलेल्या धुसर खाडीचा पसारा दिसला. मध्ये असलेल्या वावभर रूंदीच्या जुनाट बैठ्या पुलावरून अंग आकसून गाडी कशीबशी बाहेर पडली.

थोडं इकडं तिकडं तसूभर तरी झालं असतं तरी त्या रामप्रहरी गाडीसह आम्ही राम म्हणायला वेळ लागला नसता. असा अवघड प्रसंग पाहिला की मागल्या बिकट प्रसंगाची आठवण होते. अंगावर काटा मारतो. भोवती पसरलेलं निळं अथांग पेलवत नाही.

...माझ्या अंगाई चित्रपटाचं चित्रीकरण संपलं होतं. एक प्रचंड ताण आला होता. त्यातून मनाला थोडा विरंगुळा मिळावा म्हणून आम्ही मित्रांनी गोव्याला जायचं

ठरवलं. चित्रपट निर्मितीचे सारे भलेबुरे ओझं विसरावं, शिवाय गोव्यात चित्रपट लावण्यासाठी चित्रपटगृह मिळते का पहावे म्हणूनही गोव्याच्या रस्त्याला लागलो. आमची गाडी म्हापस्याजवळच्या मांडवी नदीवर आली. आयुष्यात एवढ्या मोठ्या खाडीचं पहिल्यांदाच दर्शन घडलं. असंच भल्या पहाटे. पूर्वी पूल नव्हता. लाँचमधून गाडी न्यावी लागायची. लाँच काठाला लागली. गाडी लाँचमध्ये घेताघेताच अचानक लाँच पुढे सरकली नि अर्धी पुढे खाडीकडे झुकलेली आमची गाडी आमच्या काळजाचा ठोका चुकवून गेली. साऱ्या प्रवाशांनी गाडी झटकन् धरली म्हणून बरे, नाहीतर क्षणार्धात गाडीला मांडवीनं गिळली असती. निम्मी झुकलेली गाडी अधांतरीच कशी राहिली याचे आश्चर्य सगळ्यांना वाटले. आमचे नशीब. नाहीतर अंगाई गायलाही वेळ मिळाला नसता. हळूच लाँच गाडीखाली सरकली. साऱ्यांनी सुटकेचा नि:श्वास टाकला.

...असंच अंगाईचं चित्रीकरण आमच्या वारणा नदीत चाललं होतं. 'साऊंड ट्रक' नदीच्या काठावर उभा केला होता. चित्रपटाची नायिका उमा झाडावरच्या फांदीवर बसलेल्या पक्ष्यांकडे पाहत, गाण्याचा अभिनय करीत नदीच्या पात्रात उभी होती. गाण्याच्या चित्रीकरणात सारेच दंग होते. प्रेक्षकांची ही गर्दीच गर्दी. सारे उत्सुकतेने नटीकडे पाहत होते. तेवढ्यात गाणं म्हणता म्हणताच उमा ओरडली, 'साऊंड ट्रक... साऊंड ट्रक खचू लागलाय.'

साऱ्यांनी तिकडं पाहिलं. खरेच साऊंड ट्रक खचू लागला होता. कलू लागला होता. नदीच्या मऊ मातीचा काठ भेगाळू लागला होता. अत्यंत कठीण नि अवघड. थोडं लक्ष गेलं नसतं, तर तो भला मोठा साऊंड ट्रक खोल पात्रात कोसळला असता. वस्तीवस्तींवरची वाली, दोरखंडं जमा केली. ट्रकाला बांधली नि हळूवारपणे ट्रक ओढून बाजूला काढला. जीवात जीव आला. उगाचं लक्ष गेलं नसतं तर...? साऊंड ट्रकचं काय झालं असतं !

त्या कोळणीचं लक्ष मांडवी नदीवर गेलं नसतं तर... काय झालं असतं !

पण परमेश्वराचंच लक्ष आमच्यावर होतं. म्हणून ही गोकर्णची खाडी पाहायला मिळाली. तशीच गाडी... तशीच खाडी.... आणि तोच वेळ !

थोडा चढ, थोडंसं चुकार वळण, थोडी घसरण नि उतार घेत झुंजूमुंजू पावसात गाडी चालली होती. इतक्या भल्या पहाटेसुद्धा त्या परिसराला जाग आली होती.



कुठं एखादी लाकडं भरलेली छोट्या बैलांची बुटकी गाडी भिजत चाललेली आढळत होती. एखाद्या डोंगर उतारावरून बाया माणसं गावाच्या रोखानं उतरताना दिसत होती. झुडपातून अचानक रस्त्यावर उतरणाऱ्या पायवाटेनं माणसं पटकन् समोर येत होती. कधी नारळीच्या बागेतून इकडून तिकडून माणसं महाबलेश्वर गोकर्ण गावाच्या रोखानं उतरत होती. ही माणसं तरी कशी. कोकणी आदिवासीगत. सिडसिडीत हातापायाची, वाळक्या अंगकाठीची, काळीभोर, पावसात भिजत लगभग चोहोकडून गावात उतरणारी. डोक्यावर फाटका धडपा, बायकांनी गुडघ्यापर्यंत गच्च नेसलेलं विटकं वस्त्र. वस्त्र कसलं धडपेच. काही बायकांनी तर अंगात चोळी न घातलेली. चापून चोपून नेसलेल्या लुगड्याचाच पदर समोरून गळ्यापर्यंत घेतलेला. गळ्यातल्या काळ्या तांबड्या पोतीच्या मण्यांच्या माळेत अडकलेला. पाठ उघडीच. हातात मण्यांचे दागिने, पायात कथलाचे तोडे, पुरुषही आखूड धडपा नेसलेले. विटेलेली दंडकी अंगात घातलेले. अन् सारे असेच भिजत चाललेले. मला वाटले, की माणसं झाडीझाडीतून कुठून येताहेत. भिजत एवढ्या भल्या पहाटे कशासाठी लगबग चाललेत. अन् सारेच अस चटचट आपापल्या मार्गाने उतरणारे, अनवाणी, भिजतचिंबत.

ऐन रात्रीला भिजक्या, गळत्या झोपड्यात चिंध्यांच्या बोचक्यात गुंडाळून ठेवून चालल्यागत.

जगतं आयुष्य त्यांच्या अंगावरून ओरबडून घेतल्यागत ती माणसं दिसत होती. स्त्रिया आणि पुरुषही. विझल्या वाती दिसाव्यात तशी. वाटलं, कुठं जात असतील? मनात आलं, आपण बिभिषणासारखं पक्षी बनून याचा शोध घ्यावा. बिभिषण पक्षाचं रूप घेई नि लंकेतल्या घराघरात जात असे. तसंच पक्षी रूप मला घेता आलं असतं तर... पण मी बिभिषण नव्हतो. त्याच्या नावाचा उच्चार करण्याइतकीही शुचिता माझ्यात नव्हती. अन् तो काळ प्रभुरामाचा होता. आज आमच्या साऱ्यातच रावणाचं पासंग भेटलेलं.

आमची गाडी महाबलेश्वराच्या मंदिरासमोर थांबली. अजून उजाडण्यानं पुरता डोळा उघडला नव्हता. पाऊस रिपरिपतच होता. महाबलेश्वराचं मंदिर शांत होतं आणि अवघं गोकर्ण खेडुत माणसांच्या पायवर्दळीनं जागं होत निघालं होतं. मला थोडी गंमत वाटली. झोपेत असलेल्या गावात सैनिक अचानक शिरावेत नी त्यांनीच

तेवढी चाहुलजाग गावाला लागावी तसं दृश्य दिसत होतं. मुरून बसलेल्या गावचं वातावरण वाटावं तसं भासत होतं.

आमच्या गावाकडलं जागं होणं म्हणजे कसं खडबडीत. कावळे, पाखरे यांनी साऱ्या धरित्रीलाच झडझडून जागं केलेलं असतं. तांबडं फुटलं तरी कोंबडे आरवतच असतात. दूध डेअरीचे भोंगे वाजत असतात. घराघरातून रेडिओवरची प्रात:गाणी सुरू असतात. गाव कसं टक्क जागं होऊन कामाधामाला बाहेर पडत असतं. टेंपो, ट्रॅक्सचे हॉर्न वाजत असतात.

पण इथं कसं शांत. निस्तब्ध, 'अजून नाही जागे गोकुळ' या गाण्यातल्यासारखी या गोकर्णची शांत निरामयता.

गोकर्ण जागं नसलं तरी ज्या जोशांच्या घरी आम्हाला आसरा घ्यायचा होता, त्या जोशांच्या वाड्यात मंद दीप तेवत असताना दिसला. हा मुलूख कानडी बोलीचा. संपादक साहेबांना कानडी कळत होतं. हवं तसं वळत होतं. मला थोडं कुचंबल्यासारखं वाटलं. पण जोशी चक्क मराठीत बोलले नि माझ्या नवलाला पारावर राहिला नाही. मी त्यांना म्हणालो,

'तुम्हाला मराठी बोली येते?'

'हां येते ना. इथं बरीचशी बोली मराठी आहे.'

'ते कशी काय?'

'इथल्या बऱ्याचशा मंडळींची सोयरिक महाराष्ट्राशी आहे.'

त्यांनी कोल्हापूरच्या बोळातील, पेठातील, महाद्वारातल्या खाणाखुणा सांगितल्या. जाणं येणं सांगितलं. नातेसंबंधही पटवून दिले. मग मात्र मला मोकळं मोकळं वाटलं.

जोशांचं घर कसं स्वच्छ. नीटनेटकं. जिथल्या तिथं. चकचकीत. ना आळसावलेलं की ना आमच्याकडल्यासारखा सारा बारदाणा जिथं तिथं पडलेला. आम्ही म्हणजे सारा धसमुसळेपणा. माशांची रिवरिव. जुन्या खणीचं सुंदर छोटं देवघर. देवघरात तेवती समई. बाजूला पोथ्या. काही ग्रंथ. वृद्धांच्या बैठकीची खोली. धान्याची अंधारी कोठी. शिसवी लाकडाचा, तुळतुळीत जिना माडीवरच्या अंधुक ऊबदार भुयारात शिरणारा. तिथली लसलसीत नव्हाळीतली आळसावलेली मधुर जाग. ऐसपैस आखंडाच्या भिंतीवर लावलेल्या देवादिकांच्या तसबिरी.



सारीच लोभस अशी मंदजाग.

प्रात:समयीच्या अंधुक उजेडात माझ्या डोक्यात एक प्रकाश पडला. एका पडलेल्या प्रश्नाचं उत्तर मला मिळालं. भोवतीच्या जंगलवाटातून गावात उतरणारी माणसं एवढ्या भल्यावेळी कुठं आणि कशासाठी गावात गडप होत असतील? त्यातली काही बायामाणसं मला इथं दिसली. कुणी खोल्याखोल्यांची झाडलोट करीत होतं. कुणी घरातच असलेल्या विहिरीतून पाणी शेंदीत होतं. कुणी पारोसी धुणी भांडी करीत होतं. कुणी गोठातल्या गाईंची उस्तपास्त करीत होतं. कुणी काही, कुणी काही करण्यात गुंतून गेलं होतं. सारं कसं गुपचूप. निमूट. त्यांच्या आयुष्याच्या प्रश्नचिन्हांना केवळ राबणं एवढंच माहिती होतं. साऱ्या जंगलवाटांनी वाहून आणलेली ती मुंग्यांची रांग माझ्या आयुष्यातील एका कोड्याचा उलगडा करून गेली. मुंग्यांची रांग भिंतीवरून जाते. पूर्वी मला प्रश्न पडायचे. मुंग्यांची रांग कुठून येते? कुठे जाते? कशासाठी धावत असते? मध्येच रांगेतून फुटून एकमेकींच्या कानाशी भिडून मुंग्या काय सांगत असतील? अशा प्रश्नांची रांग लागायची. या साऱ्यांची उत्तरं मला आज मिळाली. इतक्या काळानंतर.

खरं तर जीवनातील उत्तरं शोधण्यातच महाबलेश्वराचं हे पवित्र ठिकाण आहे. लंकेच्या पार्वतीचा रावण. त्यानं कुठं तप केलं नी प्रसन्न झालेल्या देवाने दिलेलं शिवलिंग घेऊन चालला. स्वर्ग हादरला. कैलासाला चिंता पडली. भलं मोठं प्रश्नचिन्ह ब्रह्मांडासमोर उभं राहिलं. जगन्नियंत्याला काळजी. रावणाला पाय उतार व्हावं लागलं.

धरित्रीवर शिवलिंग ठेवावं लागलं. रावणानं शिवलिंग उचलण्याचा प्रयत्न केला. शिवलिंग काही ढळेना. रावणाच्या तपश्चर्येवर पाणी पडलं. महासागराच्या खळाळणाऱ्या लाटांच्या साक्षीनं शिवलिंग इथेच स्थिरावलं. त्रिखंडाला पडलेल्या प्रश्नाचं उत्तर त्याच्या रूपानं इथं उभा राहिलं. महाबलिष्ठ असलेल्या रावणाचं गर्वहरण करणारा हा महाबलेश्वर, पावित्र्याचं प्रतिक. चारित्र्याचं सामर्थ्यरूप नी महन्मंगलाचं शक्तिस्थान.

या शिवपिंडाच्या मध्यभागी गाईच्या कानासारखा स्वयंनिर्मित असा खोल भाग म्हणूनच हे गोकर्ण. त्याला स्पर्श केला की पापताप जातात. मनातलं काहूर मिटतं. महासागराच्या गर्जलाटांचा जयघोष कानी पडतो. महासत्ताचे संपादक

वसंतराव मोठे चिकित्सक, तरीही मोठे श्रद्धाशील. भव्यत्वावर त्यांचा विश्वास आणि शुचितेवर निष्ठा. स्नानासाठी तिथल्या जलकुंडावर गेलो असता ते म्हणाले,

'या तलावाच्या पाण्यात उभे राहून भगवान सूर्यनारायणाला अर्घ्य अर्पण करणारे कितीतरी ब्राह्मण दिसायचे. मंचोच्चाराने इथलं चराचर मंत्रून जायचं. 'नम:शिवाय' या जयघोषाने अवघा हा महाकुंड भारून जायचा. भारतात वेदशास्त्र संपन्न सर्व विद्या पारंगत असे व्यत्पन्न ब्राह्मण इथेच जास्त असायचे. घरोघरी होमहवन चालेच. पण या तलावाच्या काठावरच जपजाप्य चालायचं. होमहवनाचं दृश्य काही वेगळं असायचं.' माझ्या डोळ्यासमोर ऋषीमुनींच्या काळातील तपोवन उभं राहिलं. ते ऋषी... ते मुनी... ते मंत्रोच्चारण... आणि त्या शिवश्लोकातून स्वत:ला हरवून बसलेला कणकण निरामय.

मी त्या प्रचंड अशा लांबरूंद पसरलेल्या जलकुंडावर नजर टाकली. एके ठिकाणी कुणी वृद्ध स्त्री स्नान करीत होती. दुसऱ्या घाटावर चारपाच स्त्री-पुरुष आले. बिगीबिगी बुडीबुडी केली नि निथळत्या अंगानं वस्त्र चढवून पांथस्थ झाले. एकेठिकाणी दशक्रिया चालली होती. नाहीतर त्या सुप्रभाती अवघा जलकुंडाच्या पायऱ्यांचा पसारा भकास दिसत होता. अन् त्या प्रचंड पाण्याच्या मध्यभागी एक पोर पोटाखाली लाल फुगा घेऊन एकटंच तरंगत होतं. ते दृश्य कसंनुसं दिसत होतं. आम्ही ते पाहिलं. 'कालाय तस्मै नम:' म्हणून ढगभरल्या आकाशाकडं पाहिलं. 'नम: शिवाय' म्हणून नाकपुडी धरून पाण्यात जागच्या जागी बुडी घेतली.

तिथून माघारी परतताना रघुनाथ शास्त्री काळजीनं म्हणाले,

'थोडं पायाकडं पाहून चला. या गोकर्णात सापांची वस्ती फार मोठी आहे. दगडांचे खिळे तर भरीभार पडले आहेत.'

मनातल्या मनात मी म्हटलं,

'नाही तरी या कलियुगात दुसरं काय असायचं?'

मंदिराकडे येताना पाऊस झिरपत होता. ओलेत्या अंगाची स्त्री पुरुष माणसं दिसली. आधी समुद्रात स्नान करून मगच या तलावात स्नान करायचा रिवाज आहे. त्यात शास्त्रही असावं. या पद्धतीनं स्नान केलं की साऱ्या व्याधी नष्ट होतात असं सांगितलं जातं. पण आम्ही हे शास्त्र मोडलं होतं म्हणून वाटेतल्या



श्रीगणेशाच्या चरणांचं दर्शन घेतलं. अगदी ओलेत्या अंगानंच. श्रीगणेशाची इथली मूर्ती मात्र मला फारच प्रेमळ वाटली. जिव्हाळ्याच्या कौतुकानं आई जशी लेकराकडं पाहते, तशी श्रीची नजर स्निग्ध होती. साईची माया तीत भरून राहिली होती. कधी काळीचा ऋणानुबंध असावा असं मला तरी वाटलं. खूप खूप ओळखीची वाटली. असं क्वचितच घडतं. मनातच बोल घुमले, 'त्वम् अग्निस्त्वम्... वायुस्त्व... सूर्यस्त्वम्'

तशाच तृप्त मनानं महाबलेश्वराच्या मंदिरात पाय टाकला नि तिथल्या प्राकारानं अधिकच प्रसन्न वाटलं. आतला गाभारा तर मंद प्रकाशानं आमच्या मनाचा गाभारा उजळून टाकणारा ठरला. धुपदीपाचा मंद गंध अंत:करण अधिकच उल्हसित करीत होता. फुला तांदळातल्या, दुधाबेलाचा अभिषेक शिवपिंडीवर घातला जात होता. जो तो शिवपिंडातल्या खोल गोकर्णाला स्पर्श करीत होता. त्या पुरातन ब्रह्माचा स्पर्श काही आगळा होता. पाताळ गर्भापर्यंत घेऊन जाणारा होता. तिथं साऱ्या धर्माचे, साऱ्या भाषा बोलणारे, भिन्न भिन्न थरातील आबालवृद्धांना येणारी स्पर्श जाणीव एकच होती. तोच अनुभव होता. त्या शिवसंकल्पाचा. एकदा मनात येऊन गेलं, साऱ्या अशिवांनी बरबटलेल्या या मातीच्या हाताचा स्पर्श या शिवगंधाला मलिन तर करणार नाही ना? त्या स्वयंभू उद्भवाची कळी कोमेजणार तर नाही ना?

याच वेळी मला मथुरेच्या श्रीकृष्ण जन्मस्थळाची आठवण झाली. असाच अभेद्य दगडांचा गोल, स्पर्शगार, बंदिस्त गाभारा.

दोन्हीही मुक्तिस्थलं होती. शक्तिस्थलं होती.

एकानं रावणाच्या भयछळापासून त्रिखंडाला मुक्तश्वास घेता आला. दुसऱ्यानं क्रूरकर्मा कंसापासून मथुराजनांचा कंठ मोकळा झाला.

या दोन्ही उद्भवांची कथा मला मिळतीजुळती वाटली.

पुराण काळाच्या साक्षी आठवत, त्या जयखुणा काळजात नोंदवत त्या भक्कम महाद्वारातून बाहेर पडलो आणि समोरच्या मोकळ्याचाकळ्या भव्य आभाळपटाचं दर्शन घडलं. अथांगात पसरलेल्या निळ्याशार सागराचं दर्शन झालं. महाबलेश्वराच्या चरणस्पर्शासाठी अत्यंत आतूर होऊन महासागराच्या प्रचंड लाटा उसळत येत होत्या. उजव्या बाजूच्या कातळावर आपटत होत्या. फुटत होत्या. परत परत उसळत होत्या. अन् डाव्या बाजूच्या पुळणीभर धावत होत्या.

लांबवर पसरलेला निळ्याशार सागराचा तो धुसर काळा अथांग आणि इथं अनावर होऊन उसळत फुटणाऱ्या जलराशींच्या शुभ्र लाटा... तो उद्‌घोष... हे सारं पुरातन काळाचं एक एक सर्गरूप होतं.

पण या भव्य शक्तिमानानं कधीच लक्ष्मणरेषा ओलांडली नाही की आगळीक केली नाही. पण ज्यांची चाल आगळीकाकडे असते; त्यांची तप:साधना कशी निरर्थ ठरते, त्याचं एक सुंदर आख्यान इथल्या कणाकणातून प्रकटत राहते. निळ्या अथांगात झरत राहते. त्याचे अनाहत नाद घुमणारे हेच ते गोकर्ण !

गोकर्ण महाबळेश्वर आणि तो सतत उसळत असणारा सागर यांचं काही अतूट भावबंधाचं नातं असावं. सागराचा खट्याळ लडिवाळपणा आम्हालाही जाणवत होता. त्याच्या रूपेरी लाटा उसळत अंगावर येत होत्या. पायावरून सरसरून चढताना किती सुरेख वाटतं. अंगभर एक गोड शिरशिरी सरसरत जाई. पुळणीवरून लाटा परत ओसरताना पायांना प्रचंड ओढ लागे. पायाखालची वाळू काढून घेत लबाडासारख्या माघारी आत पळत. सुखाच्या भरतीच्या वेळीही अशीच नियती पायाखालची वाळू नकळत काढून घेत असावी. त्या मऊशार धुंद तळव्यांना त्याचं भानही नसतं, तेवढं अवधानही नसतं. कोसळ सावरता येत नाही. त्या दु:खाला कवेत घेता येत नाही. त्या तप:धुंद लंकेशाच्या पायाखालची वाळू इथंच, अशीच कसल्या तरी वेडापायी घसरली होती. आंधळ्या झालेल्यांची गत अशीच होत असते.

मी व वसंतराव दत्तवाडेसाहेब त्या मऊ पांढरपुळणीत पाय रोवून उभे होतो. पायखेळी करणाऱ्या त्या महासागराचं रूप किती लोभस, हसरं आणि लाडे लाडे गळ्यात पडणाऱ्या लडिवाळाचं होतं. ते अगस्ती ऋषी, त्याचं आचमन करण्याऐवजी कासवीच्या मायेनं त्याला अंजारत-गोंजारत राहिले असतील. सागर आचमनाचं पुराण आम्हाला खोटं असावं असं वाटलं, असं ते सागराचं लोभस रूप होतं.

समोर उसळणाऱ्या लाटांच्या खाली-वर होणाऱ्या शुभ्रधवल भिंती, त्यामागं पसरलेला, नजरेला न झेपणारा निळा सागर, वर न पेलणारा आकाशाचा घुमटगाभारा, सागर नि आकाश एकमेकांत विरवून टाकणारं दूरवरचं धूसर क्षितिज. सागरानं



कपाळाला भस्म विलेपन केल्याप्रमाणं भासणारा पुळणीचा किनारपट्टा नि हिरव्या नारळांच्या बागांच्या पार्श्वभूमीवर उभं असलेलं त्या महाबलेश्वराचं मंदिर. या विराट आसमंताच्या गर्भगाभाऱ्यात आम्ही कसे हे सारे काळजाच्या कोयरीत साठवून ठेवीत असलेले. सनातनाचा तो मधूर हुंकार ऐकण्या-पाहण्यात दंग होतो. तेवढ्यात कानात आवाज आला 'गुड डे' वळून पाहिलं तर एक परकीय गोरंगोमटं जोडपं. खूप जुनी ओळख असावी अशा हसऱ्या नजरेनं आमच्याकडे पाहत होतं. डोळ्यात आणि ओठांत चांदणी हसरेपणा. ते त्यांचं जीवलगपण सातासमुद्रापलीकडचं वाटलं नाही. ही माणसं भारताचं वैभव पाहण्यासाठी कुठं कुठं पोहोचतात याचं आश्चर्य वाटलं. आयुष्याच्या किनाऱ्यावर कोण असं भेटेल सांगता येत नाही. पांडवांच्या वनवासात विराट राजा नाही भेटला? प्रभू रामाच्या वनवासात वायूपुत्र नाही भेटला? पंख तुटलेला जटायू नाही भेटला? प्रभू रामाचा अश्वमेध घोडा लव-कुशांनी अशाच वळणावर नाही अडवला?

त्या इंग्लिश जोडप्यानं शहाळी पिऊन रिकामी कवचं पुळणीत फेकून दिली. तेवढ्यात एक आदिवासी काळी बाई आली नि तिनं ती उचलली. दूर नेऊन कवचाच्या आतला शहाळ्याचा पातळ थर बोटांनी काढून खाऊ लागली. ती गोरी माणसं सागराचं नर्तन बघण्याचं सोडून त्या आदिवासी बाईचं वर्तन बघू लागली. आम्हाला कससंच वाटलं.

नारळाच्या झावळ्यांच्या झोपड्यातील शहाळी विकणारा तो आदिवासी अन् त्याच्या अगदी विरोधी असलेला हा गोरा कॅनव्हास. आता खवळलेला सागर नि तेवढ्याच धीरगंभीरतेने अचलतेनं उभी असलेली धरित्री यांचा हा द्वंद्व समास आणि आम्ही म्हणजे सगळ्याच द्वंद्वानं पुरेपूर भरलेला विरोधाभास. या डोळ्यांनी थक्क तरी किती व्हावं !

सकाळची ओली सकाळ आता कोरडी झाली होती. सगळीच वर्दळ वाढली होती. जोशांच्या घरात सुंदर मंत्रोच्चारांचा जयघोष कानावर पडला. मंत्रोच्चाराची होणारी लयबद्ध आवर्तनं वातावरण पवित्र करून जात होती. संस्कृत श्लोकाच्या आवर्तनांनी भरलेला पुरातन ऋषिमुनींचा काळ उभा राहिला. हा अनुभव काही वेगळाच होता. प्रथमचा अनुभव होता. सारं कसं शांत, स्तब्ध, मनाचा कोष ओंकारानं भरून राहिलेला.

अनुष्ठानं अकरा हजार करायची होती. सकाळी ९ ते १२ पर्यंत अकरा ब्राह्मण अनुष्ठानाला बसले होते. तरीही फक्त अकराच आवर्तनं पुरी झाली होती. प्रत्येक ब्राह्मणास अडीचशे रुपये, श्रीफल आणि केळीच्या पानावरचं सुग्रास जेवण, गरम गरम भात, तूप, वरण, लोणचं, कोशिंबीर, पापड नि गोड खीर. हेच भोजन तिकडे. माझ्या डोक्यात विचार आला. केवळ अकरा आवर्तनांना पाच हजार खर्च आला, तर मग अकरा हजार आवर्तनांना किती खर्च येईल? माझ्या गणिताच्या कल्पनेच्या आणि कुवतीच्या पलीकडचं कोडं होतं. पण भले भले अनुष्ठानं करतात. राजीव गांधीनीही अनुष्ठानं करवून घेतली होती म्हणे. देशातील तज्ज्ञ ब्राह्मणांना अनुष्ठानास बसण्यासाठी निमंत्रणं धाडली होती.

ज्यांना राजीव गांधीच्या अनुष्ठानाचं निमंत्रण आलं होतं, ते एक शास्त्री आमच्याबरोबर होते अन् आता त्यांचं म्हणणं होतं की, पंतप्रधान देवेगौडांनी अनुष्ठानं घेतली, तर त्यांचं सरकार जानेवारीनंतर टिकेल. इथल्या या वातावरणामुळे रात्रीचा शीण नाहीसा झाला होता. तृप्त मनानं पानावरून उठलो. बऱ्याच काळानंतर केळीच्या ताज्या हिरव्या पानावरचं भोजन तितक्याच टवटवीत अंत:करणानं घेतलं. स्वादिष्ट लागलं. नाही तर 'पानं वाढलीत' असा घरचा आग्रह ऐकायचा नि चक्क स्टीलच्या ताटावर बसायचं. 'पान वाढलीत'चा जिव्हाळा त्या केळीच्या पानातून आज किती युगांचा वाटला. कारण ते एक निसर्गरूपच होतं.

गोकर्ण सोडण्याआधी पुन्हा एकदा महाबलेश्वराचं दर्शन घेतलं. बाजारपेठेतून जाताना दत्तवाडेसाहेब चटकन् बाजूला झाले. दहा रुपयांची नोट एका बंद दुकानाच्या फटीतून त्यांनी आत टाकली. मी विचारलं तेव्हा म्हणाले, 'सकाळी स्नानाला जाताना साबण वडी घेतली होती. पैसे जवळ नव्हते त्यावेळी. नंतर देईन म्हटलं होतं. दुकानदारानं विश्वास ठेवला होता. आता पैसे दिले. त्याचा विश्वास विश्वासच राहावा. नाहीतर या पुण्यक्षेत्रीचं हे कर्ज न फिटण्यासारखं झालं असतं.'

गाडी माडांच्या बागांतून वळणं घेत निघाली. महाबलेश्वराचं शिखर दिसेनासं झालं. चढण संपली. पुन्हा सकाळची ती लांबवर पसरलेली खाडी मागं पडली. भातांच्या खाचरांतून जाणाऱ्या रस्त्यानं धावू लागली. राजरस्ता लागला आणि कोण आधी धावतो, याची शर्यतच लागली. ही शर्यत होती डाव्या बाजूंच्या हिरव्या डोंगररांगांची, त्यांच्या कडेसरीच्या कंबरपट्ट्यासारखी शोभून दिसणारी कोकण रेल्वे,



आमची गाडी फुलासारखी झेलीत धावणारा नितळ डांबरी रस्ता आणि उजव्या बाजूनं लागणारी नारळीच्या झाडांची हिरवी राजवर्खी रांग. त्यांच्या पलीकडे पसरलेला अथांग सागर नि डोईवरचं मलमली सावळं आभाळ, यांची ती तीन पायांची शर्यत होती.

कधी लंबवर पसरलेला भातखाचरांचा हिरवागार पट्टा दिसे. कधी नारळीची बेटंच्या बेटं तालेवार बनून उभी दिसत. कधी संपत आलेल्या पिवळ्याशार फळांच्या लडी संपत आल्या असल्या तरी सुपारीच्या नटमोगऱ्या बागा लाजवंतीसारख्याही दिसायच्या. तांबूस पिवळ्या लडी उंलगल्यानं काही ताडा-माडांच्या बागा उदासही भासायच्या. कधी तांबडमातीनं नि पिवडीनं चित्ररंगी बनलेल्या छोटुल्या घरांचं देखणेपण आवारातल्या झाडाआडूनही मोह घालत होतं. कोकण रेल्वेला श्वासाश्वासाच्या आवर्तनावर वाट करून देताना पिवडीचे मनोहर डोंगर दिसत. तांबडमातीच्या गुलालानं जाळ्याजुळ्यांतून जाणारी नवोढा रेल्वे शोभून दिसायची. कधी पांढरट दगडांचे चुराचुरा झालेले कण भोवती विखुरलेले असायचे. निखंड काळ्या कपारीचा डोंगरगाभा काही दिसला नाही. कधी तांबडमातीच्या एकसारख्या दिसणाऱ्या डोंगरभिंती ढिसाळ होऊन कोसळताना पाहायला मिळत होत्या.

कधी डोंगराच्या कुशीत घुसलेली हिरवी खाणच भेटायची, तर कधी खाडीच्या वैभवाचं ऐसपैस पसरलेलं विशालपण भुलवून टाकी. डोंगरावरच्या शुभ्र धबधब्याच्या धूसर रेषा सुरेख वाटायच्या. निळाईपर्यंत विखुरलेली आगरं, भातखाचरांच्या बांधावरून दूरपर्यंत जाणाऱ्या अरूंद तांबडवाटा, निवळशंख पाण्याचे झुळझुळ वाहणारे ओहोळ यांची नरजबंदी तर काय विचारावी ! मात्र, आमच्या भागाची रूक्ष आठवण झोंबू लागली. मन खट्टू झालं. नजर कुरकुर करू लागली. श्रीखंडात कडकडीत खडा लागावा तसं झालं. आता असाच काळीज नसलेला खडकी माळ भस्मासुरासारखा पाठी लागतो की काय असं वाटू लागलं. तेवढ्यात गाडी माळाच्या माथ्यावर आली नि एकदम उताराला वळण घ्यायला उचल घेणार एवढ्यात जादू व्हावी तसं झालं. समोर एकदम एक विलोभनीय स्वप्नप्रदेश पाहून चकित झालो. केवढा नजर न पोहोचेल एवढा प्रचंड दिशान्तापर्यंत पसरलेला हिरवा-निळा मुलूख, खाड्यांचं जाळं, भव्य निळा अथांग सागर !

राजरस्ता असा जात होता की, एखादं वळण लागावं आणि अचानक सृष्टीचा नवा चमत्कार एकदम प्रकट व्हावा. आमची गाडी झाडीत चढत-उतरत गेलेल्या छोटेखानी होनावर या शहरवजा गावात शिरली. बाहेर पडली तेव्हा ते गाव एका लांब रूंद पांगलेल्या शरावती नदीच्या पाण्यात पाय सोडून निवांत बसल्यासारखं दिसत होतं. गाडी पुलावर गेली. आमची नजर भिरभिरत राहिली. थांग न लागणारं ते शरावतीचं स्वरूप पाहून आपण कुठल्या देशात आलोय असंच वाटलं. एखादी इंग्लिश भय दाखविणारी खाडी असावी. खाडीभर गर्दी करून विखरून राहिलेल्या लहान बोटी, छोटे पडाव, मोठ्या लँचेस्, असाव्यात तशाच इथंही ऐलपैल तटाला लागलेल्या, ये-जा करणाऱ्या, उगा रेंगाळणाऱ्या, तर काही मालाचं प्रचंड ओझं घेऊन दमदारपणे जाणाऱ्या कितीतरी लाँचेस्चं ते अवतरलेलं एक गावच होतं. समोरचा पूल तर इतका लांब की, नजर पोहोचता पोहोचत नव्हती. डावीकडे नजर गेली. एक नवा लांबसर वळेसरासारखा सुंदर पूल दिसला. तो कोकण रेल्वेसाठी बांधलेला देखणा पूल होता. हा कोकण रेल्वेचा खाडीवरचा सर्वात मोठा पूल मानला जातो. जवळ जवळ दीड-दोन किलोमीटर अंतर असावं. तिथला आसमंत सोनचाफ्याच्या गंधासारखा मोहक वाटला. एकीकडं अनंताची आठवण करून देणारी नदी. शरावतीच्या पाण्यावर बसलेला लाँचेस्चा गाव, कोकण रेल्वेचा पाण्यावरचा पूल, पलीकडे दिसणारे निळे डोंगर, तोंडातून सहज उद्‌गार निघाले,

'धन्य तो किमयागार सृष्टिनिर्माता !'

बाकी रस्त्याला वर्दळ फारशी दिसली नाही. माणसांची उगाच गर्दी नाही. गावंसुद्धा झाडीत लपलेली. भातखाचरांतून काम करणारी माणसं. कसला गोंगाट नाही. उगाच हाकारा नाही. की मुद्दाम चव्हाट्यावर काढलेला खाकरा नाही. रिकामटेकड्या कुत्र्यांची रस्त्यावरच मारलेली फतकल नाही. गाई-म्हशींचा अरेरावी करीत वाहतुकीत घुसणारा तांडा नाही, म्हशी तर फारशा रस्त्याच्या शेताभातांतून दिसल्या नाहीत. फक्त बुटक्या, बुटकुल्या शिंगांच्या, काळ्या, कुलंगी गाई तेवढ्या अधूनमधून पण तुरळकच आढळत होत्या. कुठे कारखान्यांतील धूर नाही की धावपळीचं कसलंच जग जाणवलं नाही. माणसं कोकणी, काळसर, काटकुळी, एखादंच वाण्या-ब्राह्मणावाणी गोरंगोमटं घर परसातल्या केळीआडून दिसायचं. शाळा सुटली तेव्हा निळ्या गणवेशातली मुलं-मुली सुरंगीच्या फुलमाळेसारख्या कोमटपणे



चाललेल्या. आमच्याकडल्या शाळा सुटल्या तर पाहाव्या, 'तंगडी मोडीन' अशी देदम भाषा. सरळ चालणं-बोलणं असतं हे त्यांच्या गावीच नसतं. ऐश्वर्याचा कैफ कुठंच जाणवला नाही. निसर्गाच्या सान्निध्यातली माणसंही तशीच निर्मळ मनाची असतात. रसाळ असतात.

पुढं अगदीच बोडका डोंगर लागला. कुंभकर्णसारख्या पडलेल्या या डोंगरावरून तेवढे उघडे झालेले मोठे काळे दगड दिसले. ते भेसूर वाटत होते. डोक्यात खवडे पडावे तसे दिसत होते. मी दत्तवाडेसाहेबांना म्हटलं, 'हा कोणता भाग?' 'भटकळ, तसाच नावाप्रमाणं भटकळ आणि खटकळ आहे. याला आपल्या देशातील 'मिनी दुबई' म्हणतात. इथली सारी सूत्रं दुबईवरून हलतात. दुबई म्हणजे यांची परड्यातली भाजी,' दत्तवाडेसाहेब सहज बोलले. त्यांचं म्हणणं यथार्थ वाटावं असं तिथलं सारं दृश्य होतं. भडक, उर्मट, मला आठवलं, निवडणुकीच्या काळात इथल्या खासदाराचा क्रूरपणे खून केला गेला होता. इथल्या रिक्षा मला वेगळ्याच वाटल्या. आमच्याकडच्या रिक्षा पोक्त, खानदानी दिमाखाच्या. आढ्यावरच्या आढ्याचा जिव्हाळा जसा असतो तसा या गावात दिसला नाही.

इथला उदास भूखंड पाहिला आणि इथं येण्याआधी मनात ठासून राहिलेला मोर्डेश्वराचा लुभावणारा किनारा आठवला. महाबलेश्वरात रावण शिवलिंग उचलताना त्या शिवलिंगाचा एक कोपरा तुटून फेकला गेला, तो इथल्या या किनाऱ्यावर येऊन पडला आणि तिथंच आता मोर्डेश्वराचं सुंदर ग्रॅनाईटचं भव्य मंदिर बांधलं गेलंय. ते फारच प्रशस्त होतं. पुळणीवरून सागरात घुसलेल्या उंच टेकडीवर त्याचं सौंदर्य अधिकच खुलून दिसतं. सागरपुळणीवर रंगीबेरंगी जत्रा आणि पाठीमागं उतावीळ सागर लाटांचा मनभावी हैदोस, दूरवरची सागराची निळाई या साऱ्या मोर्डेश्वरला लाभलेली रम्यता वेगळीच होती.

भटकळला शक्यतो लवकर मागं टाकीत गाडी धावत होती. दिवसभराची सावली अधिकच गडद होऊ लागली. सांज पसरली होती. गाडीनं राजरस्ता सोडला भातखाचरं मागं टाकीत गाडी डोंगरझाडीत शिरली. भोवतीच्या डोंगररांगांना सलाम करावा. असं त्यांचं ऐश्वर्य होतं. दूरच्या डोंगरशिखरावरून धुकं खाली घसरत होतं. जणू आभाळातून सांज उतरू लागली होती. डोंगर-पर्वतांतून पसरत चालली होती. डोंगरपर्वतांनी वेढलेल्या कोल्लुरातच्या तळठाण्यातील झाडीत आम्ही आलो आणि